# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,


नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in


## गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहीरात

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर** यांचे अधिनस्त नागपूर, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, वर्धा व गोंदिया या जिल्हयातील संस्थामधिल खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील गट-क व गट-ड संवर्गातील मागासवर्गीय अनुशेषातंर्गत रिक्त पदे तसेच शासनाची विशेष मंजुरी प्राप्त रिक्त पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. **अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता, भरती प्रक्रीयेसंबंधिच्या सर्वसाधारण अटी व शर्ती, इत्यादी साठी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.rdtenagpur.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.** अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन पुर्णपणे भरलेला अर्ज परीक्षा शुल्काच्या दर्शनीय हुंडी (**Demand Draft**) तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रासह **सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, मंगळवारी बाजार सदर, नागपूर-४४०००१** येथे **दिनांक ०६/११/२०१२ सायंकाळी ५ वाजेपर्यंत** स्विकारण्यात येईल. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केल्या जाणार नाही.

| अ. क्र. | पदाचे नांव/ वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार | सामाजिक व समांतर आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र. | इ.मा. व. | खुला | एकुण |
| संवर्ग - गट क | | | | | | | | | | | |
| १ | वरिष्ठ लिपीक पे बॅन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- | १ | - | - | - | - | - | - | - | अंशकालिन-१ | २ |
| २ | कनिष्ठ लिपीक पे बॅन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- | १ | - | - | - | १ | भुंकपग्रस्त-१ | | १ | | ४ |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक पे बॅन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २०००/- | - | - | - | - | - | - | - | - | भुंकपग्रस्त-१ प्रकल्पग्रस्त-१ माजीसैनिक-१ | ३ |
| ४ | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक पे बॅन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- | - | - | - | - | - | - | - | महिला-१ | ३ | ४ |
| ५ | यांत्रिकी/यंत्रकारागिर पे बॅन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ६ | सुतार पे बॅन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- | - | - | - | - | - | १ | - | - | - | १ |
| संवर्ग - गट ड | | | | | | | | | | | |
| ७ | शिपाई / हमाल / ग्रंथालय शिपाई पे बॅन्ड ४४४०-७४४० ग्रेड वेतन १३००/- | - | भुंकपग्रस्त-१ प्रकल्पग्रस्त-१ माजीसैनिक-१ | - | - | - | - | प्रकल्पग्रस्त - १ | भुंकपग्रस्त - २ प्रकल्पग्रस्त - ३ | - | ९ |

टिप : अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता, भरती प्रक्रीयेसंबंधिच्या सर्वसाधारण अटी व शर्ती, इत्यादी साठी या कार्यालयाचे संकेतस्थळ **www.rdtenagpur.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

दिनांक - २३/१०/२०१२

ठिकाण - नागपुर

( गुलाबराव ठाकरे )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

# शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य अटी

| अ. क्र. | पदाचे नांव/ वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार | शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|
| संवर्ग - गट क | | | |
| १ | **वरिष्ठ लिपीक**<br>पे बॅन्ड ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन २४००/- | कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक व शासकीय/मान्यताप्राप्त कार्यालयात प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | लेखी परिक्षा |
| २ | **कनिष्ठ लिपीक**<br>पे बॅन्ड ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन १९००/- | एस.एस.सी. उत्तीर्ण<br>इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.<br>मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. | लेखी परिक्षा |
| ३ | **प्रयोगशाळा सहाय्यक**<br>पे बॅन्ड ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन २०००/- | एस.एस.सी. गणित व विज्ञान विषयासह व प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | लेखी परिक्षा व मुलाखत |
| ४ | **तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक**<br>पे बॅन्ड ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन २४००/- | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे / समकक्ष शासनमान्य स्वायत्त संस्थेतील अभियांत्रिकी शाखेतील तीन वर्षीय पदविका (Engineering and Technology) उत्तीर्ण<br>संबधित क्षेत्रातील १ वर्षाचा प्रयोगशाळा सहाय्यक/मॅन्युफॅक्चरींग/सर्व्हिसिंग/मेन्टेनन्स/ डिझाईन अनुभव व सी.एन.सी. मशीन हाताळण्याचा अनुभव | लेखी परिक्षा, व मुलाखत |
| ५ | **यांत्रिकी/यंत्रकारागिर**<br>पे बॅन्ड ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन २४००/- | एस.एस.सी. उत्तीर्ण<br>शासनमान्य आय.टी.आय.यांत्रिकी (Machinist) अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>अनुभव असल्यास प्राधान्य | लेखी परिक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत |
| ६ | **सुतार**<br>पे बॅन्ड ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन २४००/- | एस.एस.सी. उत्तीर्ण<br>शासनमान्य आय.टी.आय. सुतार अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>अनुभव असल्यास प्राधान्य | लेखी परिक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत |
| संवर्ग - गट ड | | | |
| ७ | **शिपाई/हमाल/ग्रंथालय शिपाई**<br>पे बॅन्ड ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन १३००/- | चौथा वर्ग उत्तीर्ण<br>संबंधीत पदाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक | लेखी परिक्षा व मुलाखत |

**( गुलाबराव ठाकरे )**
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**

# <u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>

१. **वयोमर्यादा** : जाहीरातीतील नमुद सर्व पदांकरीता उमेदवारांचे वय जाहिरातीच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे तसेच सर्व साधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम म्हणजेच ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अपंग, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, पदविधर अंशकालीन कर्मचारी, भुंकपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहील.

२. **अर्ज सादर करण्याची पध्दत व पाठविण्याचा पत्ता** : इच्छुक व अर्हता प्राप्त उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत अर्जाच्या नमुन्यात परिपुर्ण भरलेले अर्ज आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर - ४४० ००१ या पत्यावर पाठवावेत.

३. रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन अधिकारी सेवायोजन कार्यालय, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय इत्यादी कार्यालयांकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील वरीलप्रमाणे विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

४. **परिक्षा शुल्क** : वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक पदांच्या परिक्षेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१५०/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.७५/- व इतर सर्व पदांच्या परिक्षेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१००/- परिक्षा शुल्क आहे. सदर परिक्षा शुल्क **Joint Director of Technical Education R.O. Nagpur Payble at Nagpur** यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेच्या दर्शनीय हुंडी **(Demand Draft)** द्वारे अर्जासोबत जोडावे लागेल. अन्य नावाने काढलेला व राष्ट्रीयकृत बँकेतून न काढण्यात आलेला तसेच कमी रक्कमेचा दर्शनीय हुंडी स्विकारला जाणार नाही. **माजी सैनिकांसाठी परिक्षा शुल्क लागु नाही.** तसेच परिक्षा शुल्क हा ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

५. सर्व पदांच्या पात्र उमेदवारांची जाहिरातीत शेरा या ठिकाणी पदनामानुसार नमुद केल्याप्रमाणे लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत घेण्यात येईल.

६. अंतिम गुणवत्ता यादी लेखी परिक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत यांचे एकुण गुणांवरुन ठरविण्यात येईल.

७. उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८. वरिष्ठ लिपीक पदांची लेखी परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी व विभागाची माहीती या विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यांत येईल.

९. कनिष्ठ लिपीक पदांची लेखी परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहीती या विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यांत येईल.

१०. प्रयोगशाळा सहाय्यक व तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहीती इत्यादी विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १८० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यांत येईल.

११. यांत्रिकी/यंत्रकारागीर व सुतार या पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहीती इत्यादी विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यांत येईल.

१२. शिपाई/हमाल/ग्रंथालय शिपाई या पदांकरीता मराठी, सामान्य ज्ञान, भौगोलिक ज्ञान इत्यादी विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन ८० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यांत येईल.

१३. अर्जासोबत (अर्जातील माहितीचे पृष्ठयार्थ) शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास), अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र इ. व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारण्यात येईल. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी सादर केलेलीच कागदपत्रे विचारात घेतल्या जाईल. त्यांनतर सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतल्या जाणार नाही.

१४. शिपाई/हमाल/ग्रंथालय शिपाई ही पदे वगळून वरिल सर्व पदांकरीता D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा ' O ' स्तर किंवा ' B ' स्तर किंवा ' C ' स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) मुंबई यांच्याकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत संगणक हाताळणे / वापराबाबतचे विहीत प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यांत येईल.

१५. उमेदवारांना लेखी परिक्षा / कौशल्य चाचणी / मुलाखत यासाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१६. अर्जासोबत रु.५/- ची तिकीटे लावलेला स्वतःचा संपूर्ण पत्ता लिहीलेला लिफाफा जोडावा.

१७. आवेदन पत्रावर उजव्या वरील बाजूला नूकताच काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो लावण्यात यावा.

१८. लेखी परिक्षा / कौशल्य चाचणी / मुलाखतीचे वेळापत्रक मुलाखत पत्रात (Call Letter) तसेच या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१९. शासन निर्णय क्रमांकःअनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ प्रमाणे "परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू राहील.

२०. समांतर आरक्षणातील योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबधीत प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारांचा त्यासाठी विचार केला जाईल.

२१. शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांचे मार्फत कार्यालयाचे "ना-हरकत प्रमाणपत्र" घेऊन या कार्यालयास सादर करावे.

२२. अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. तसेच अंशकालिक उमेदवारांच्या बाबतीत अनुभव एक वर्ष म्हणजे तीन महिने या प्रमाणे गृहीत धरण्यात येईल.

२३. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतिक व न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ३०/०६/२००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे **(नॉन क्रिमीलेअर)** सक्षम अधिकाऱ्यांचे दिनांक ३१/०३/२०१३ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

२४. आरक्षीत पदाकरीता उमेदवारांची निवड झाल्यास जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेळेच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

२५. जाहिरातीत शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शविण्यात आलेले आहे. तथापि, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांचा अंतिम निवडीसाठी प्राध्यान्याने विचार करण्यांत येईल.

२६. शासन अधिसूचना एसआरव्ही-२०००/प्र.क्र./(१७/२०००)बारा, दिनांक २८/०३/२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सदर नमुना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

२७. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहीती / कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२८. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. निवडी साठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

२९. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती विभागात कोठेही करण्यांत येईल व तो बदलीस पात्र राहील.

३०. अपंग उमेदवारांकरीता अपंगाचे प्रमाण ४० टक्के पेक्षा कमी नसावे, अर्जासोबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगाबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३१. अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन इ. व अन्य कारणांमुळे पदसंख्या व (पदसंख्येत कमी / जास्त होणे) आरक्षणामध्ये बदल होऊ शकते. सदरची पदे मा.आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांचेकडील अतिरिक्त कक्षाकडून उमेदवार प्राप्त होण्याचे ना-हरकत प्रमाणपत्राचे अधिन राहून देण्यात येत आहे. अतिरिक्त कक्ष, नागपूर यांच्याकडून मागणीनुसार उमेदवार उपलब्ध झाल्यास उक्त पदांमध्ये बदल होऊ शकतो. याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

३२. एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास पदनिहाय स्वतंत्र अर्ज सादर करावा.

३३. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास त्याचा नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करावा व प्रमाणपत्राची छायाप्रत अर्जासोबत जोडावी. सदर उमेदवारांनाही जाहीरातीतील सूचना / बाबी लागू होतील.

३४. जाहीरातीचे अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे वा ती रद्द करण्याचे सर्व अधिकार सहसंचालकांनी राखुन ठेवले आहेत.

३५. पद भरतीबाबतचे संपूर्ण वेळापत्रक / अधिसुचना तसेच परीक्षेला पात्र/अपात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यांत येईल.

३६. उमेदवारांनी पदभरती प्रक्रीये विषयक माहितीसाठी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर नियमित पाहणी करावी.

**( गुलाबराव ठाकरे )**
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**

अर्जाचा नमूना

**कार्यालयीन कामाकरीता**

आवक क्रमांक.............   संगणक क्रमांक.............   आसन क्रमांक.............

उमेदवाराचा फोटो

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन,परिसर मंगळवारी बाजार,

सदर, नागपूर-४४०००१

विषय : ..........................................................................या पदासाठी अर्ज

०१. उमेदवाराचे संपूर्ण नांवः ..........................................................................................

(स्वतःचे नांव)   (वडिलांचे/पतीचे नांव)   (आडनांव)

०२. जन्म तारीख : ........................... वय (दि.०१.१०.२०१२ रोजीचे)वर्ष ............. महिने............. दिवस...........

(वयाचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्यावर नोंद केल्याप्रमाणे)

०३. लिंग : पुरुष / स्त्री (लागु नसेल ते खोडावे)

०४. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ..........................................................................................

(पिनकोड क्रमांकासाह) ..........................................................................................

..........................................................................................

०५. भ्रमणध्वनी क्रमांक : ..............................................ई-मेल पत्ता : ..........................................

०६. सामाजिक आरक्षण : (योग्य त्या ठिकाणी √ अशी खुण करावी)

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | इ.मा.व. | वि.मा.प्र. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

जात : .................................................. पोटजात :..................................................................

०७. समांतर आरक्षण : (योग्य त्या ठिकाणी √ अशी खुण करावी)

| महिला | भुंकपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अंशकालिन | माजीसैनिक | अपंग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

०८. विवाहीत / अविवाहीत : -------------------------

(विवाहीत असल्यास लहान कुटुंब असल्याचे नमुना अ मधील प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे)

०९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे नांव, पत्ता, नोंदणी क्रमांक व तारीख (असल्यास) : ................................

..........................................................................................

..........................................................................................

१०. दर्शनीय हुंडी (डी. डी.) क्रमांक .......................... दिनांक ...................... रक्कम ..............................

बँकेचे नांव : ..........................................................................................

११. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे किंवा नाही : ..........................................................................

१२. शैक्षणिक अर्हता :

| अ. क्र. | परिक्षा | शाळा/विभागीय मंडळ/ विद्यापीठ/ संस्था | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ था वर्ग | | | | |
| २ | एस.एस.सी. (दहावी) | | | | |
| ३ | एच.एस.सी. (बारावी) | | | | |
| ४ | पदवी (बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी.) | | | | |
| ५ | आय.टी.आय. | | | | |
| ६ | तांत्रिक पदविका | | | | |
| ७ | तांत्रिक पदवी / पदविका | | | | |
| ८ | पदव्युत्तर पदवी / पदविका | | | | |
| ९ | एम.एस.सी.आय.टी. | | | | |
| १० | टंकलेखन (मराठी व इंग्रजी) | | | | |
| ११ | इतर | | | | |
| १२ | इतर | | | | |

१३. अनुभव :

| अ. क्र. | शासकीय/निमशासकीय/ अशासकीय आस्थापनेचे नांव | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी | | | | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

१५. उमेदवार अपंग आहे काय : होय / नाही (असल्यास) अस्थिव्यंग / मुक व कर्णबधिर / अंध

मी याद्वारे जाहीर करतो/करते की, माझ्या माहीती व ज्ञानानुसार वरील तपशिल सत्य व अचूक आहे. कोणताही तपशिल खोटा आढळल्यास माझी उमेदवारी / नियुक्ती रद्द झाल्यास अथवा होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र असेल. अर्ज परिपूर्ण नसल्यास अथवा पृष्ठार्थ आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज रद्दबातल ठरविला जाईल व त्याबाबत मला काहीही कळविले जाणार नाही. याची मला जाणीव आहे. मी प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, वरील माहीती जाणिवपूर्वक व विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहीती खोटी आढळल्यास माझे अर्ज फेटाळून लावण्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार / हरकत राहणार नाही. जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही

**महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम - २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ प्रतिज्ञापत्र**

**(विवाहीत उमेदवारांसाठी)**

**नमुना - अ**

**(नियम - ४ पहा )**

मी श्री/श्रीमती/कु. ........................................................................................................................

श्री ........................................................................यांचा मुलगा/ यांची मुलगी/पत्नी वय ...................... वर्ष, राहणार

.................................................................. याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१. मी ................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. अजा रोजी मला..........(संख्या) इतके हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या...............आहे.(असल्यास जन्मतारिख नमुद करावी)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही .

---

**परिक्षेसाठी ओळखपत्र**

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन तो साक्षांकीत करुन घ्यावा

१. पदाचे नांव : ......................................................................

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव : ......................................................................

३. परिक्षेचा आसन क्रमांक : ......................................................................

४. परिक्षा केंद्र : ......................................................................

५. परिक्षेचा दिनांक व वेळ : ......................................................................

६. उमेदवाराची नमुना स्वाक्षरी : ..............................................

(फोटो राजपत्रित अधिकारी/विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे. ओळख पत्रातील क्रमांक ३,४,५ वरील माहीती वगळून इतर माहीती उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी स्वतः भरावी)